# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः04.01.2026** **वारःरविवार**

---

1 )व्हेनेजुएला मध्ये सत्तेचं जोपर्यंत सुरक्षित, योग्य आणि न्याय्य हस्तांतरण होत नाही, तोपर्यंत अमेरिका व्हेनेझुएलाचा कारभार चालवणार- अमिरीकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच स्पष्टीकरण

2 ) व्हेनेझुएलावरील हल्ल्याच्यासंदर्भात संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची उद्या आपत्कालीन बैठक

3 ) व्हेनेजुएला मधील हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, भारतीय परराष्ट्र मंत्रालयाकडून नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी

4) देशात तीन नव्या फौजदारी कायद्यांमुळे 2029 पर्यंत, सत्र न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत वेळेमध्ये न्याय मिळेल- गृहमंत्री अमित शाह

आणि

5) राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी, अंतिम उमेदवार यादी जाहीर

**ट्रम्प**

व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मडुरो आणि त्यांच्या पत्नी सिलिया फ्लोरेस यांना अमेरिकेनं ताब्यात घेतलं असून , न्यूयॉर्कमध्ये त्यांच्यावर खटला चालवला जाईल, अशी माहिती अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल दिली. अमेरिकेनं काल सकाळी व्हेनेझुएलावर मोठ्या प्रमाणात हल्ला केला. त्या पार्श्वभूमीवर , डोनाल्ड ट्रम्प यांनी काल फलोरिडा इथ घेतलेल्या पत्रकार परिषदेत अमेरिकेची भूमिका स्पष्ट केली. ट्रंप-व्हेनेझुएला

आपल्या निर्देशानुसार व्हेनेझुएलाची राजधानी कराकासमध्ये विशेष लष्करी कारवाई करण्यात आल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. सत्तेचं जोपर्यंत सुरक्षित, योग्य आणि न्याय्य हस्तांतरण होत नाही, तोपर्यंत अमेरिका व्हेनेझुएलाचा कारभार चालवणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मडुरो यांच्यावर दहशतवाद, अंमली पदार्थांचा पुरवठा, अमेरिकेविरोधात मशीनगन आणि इतर संहारक शस्त्रांचा वापर यासारखे आरोप आहेत. तसंच, आता व्हेनेझुएलाच्या भविष्याचा निर्णय अमेरिका घेईल, असंही ट्रम्प यांनी सांगितल.

व्हेनेझुएलानं देशात आणीबाणी जाहीर केली आहे. अमेरिकेची ही कारवाई अतिशय गंभीर असून व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष मडुरो आणि त्यांच्या पत्नी कुठे आहे आणि कोणत्या अवस्थेत आहेत हे सांगावं, अशी मागणी उपाध्यक्ष डेल्सी रॉड्रीग्ज यांनी केली

रशिया, क्यूबा, इराण यासारख्या देशांनी अमेरिकेच्या हल्ल्याचा निषेध केला. व्हेनेझुएलाच्या सार्वभौमत्वावर हे अतिक्रमण असल्याचं या देशांनी म्हटलं आहे. हे आक्रमण आणखी न वाढवण्याचं आवाहन रशियानं केलं. सर्व मुद्दे चर्चेद्वारे सोडवण्याचं आणि त्यासाठी मदत करण्याची तयारी रशियानं दाखवली. आंतरराष्ट्रीय समुदायानं या प्रकरणी लवकर प्रतिक्रिया द्यावी असं आवाहन क्युबानं केलं आहे.

व्हेनेझुएलावरील हल्ल्याच्या संदर्भात संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेची उद्या आपत्कालीन बैठक बोलावण्यात आली आहे. सुरक्षा परिषदेचा अस्थाई सदस्य असणाऱ्या कोलंबिया देशाच्या मागणीवरून ही बैठक बोलावण्यात आली असून या निर्णयाला चीन आणि रशियाने पाठिंबा दिला आहे कोलंबियाचे राष्ट्रपती गुस्तावो पेट्रो यांनी संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेला पत्र लिहाल आहे . त्यात त्यांनी अमेरिकेच्या या हल्ल्याचा निषेध केला असून , आंतरराष्ट्रीय शांतता राखण्याबरोबरच आंतरराष्ट्रीय कायदा आणि मानवतेच रक्षण करण याला सरत जास्त महत्व देन आवश्यक आहे अस गुस्तावो पेट्रो यांनी पत्रात म्हंटल आहे.

संयुक्त राष्ट्रांचे महासचिव ॲन्टनियो गुटेरस यांनी अमेरिकीने केलेल्या या हल्ल्या बद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे तसच ही कारवाई भीषण असल्याच म्हंटल आहे संयुक्त राष्ट्रांचे प्रवक्ते स्टीफन डुजारिक यांनी यासंदर्भात सांगितल की संयुक्त राष्ट्रांचे महासचिव ॲन्टनियो गुटेरस यांनी चिंता व्यक्त करून सांगितल की अमेरिकेने आंतरराष्ट्रीय कायद्याच उलंघन केल असून या कारवाईचे गंभीर क्षेत्रीय परिणाम होऊ शकतात. व्हेनेजुएला मधील मानवाधिकार आणि कायद्याच्या राज्याचा सन्मान राखून सर्वसमावेशक संवाद करण्याच आवाहन ॲन्टनियो गुटेरस यांनी केल आहे.
दरम्यान , व्हेनेजुएला मधील हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, भारतीय परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने भारतीय नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. भारतीय नागरिकांनी शक्यतो महत्वाचे काम नसल्यास व्हेनेजुएला मध्ये प्रवास करणे टाळावे , तसच त्या देशात राहणाऱ्या भारतीय नागरिकांनी काळजी घ्यावी , अतिरिक्त प्रवास टाळावा , कामाशिवाय घराबाहेर पडू नये आणि व्हेनेजुएला च्या राजधानी कारकस इथल्या भारतीय दूतावासाच्या संपर्कात रहाव असे निर्देश परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने दिले आहेत.

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी वाराणसी इथं आज ७२ व्या राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धांचं दूरदश्य प्रणालीदारे उद्घाटन करणार आहेत. यावेळी उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित राहणार आहेत. येत्या ११ तारखेपर्यंत या स्पर्धा डॉ संपूर्णानंद क्रिडा संकुलामध्ये सुरु राहणार असून विविध राज्यातील महिला आणि पुरुष गटात एकंदर 73 संघ या स्पर्धांमध्ये सहभागी होणार आहेत. यामध्ये 1 हजार पेक्षा जास्त स्पर्धक खेळणार असून पूर्वांचल भागात प्रथमच एवढ्या मोठ्या स्पर्धेच आयोजन करण्यात आल आहे .

**<u>शहा</u>**

तीन नव्या फौजदारी कायद्यांमुळे 2029 पर्यंत, सत्र न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत वेळेमध्ये न्याय मिळेल असं गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. अंदमान - निकोबार बेटांवरील श्री विजयपूरम इथे केंद्रीय गृहमंत्रालयाच्या संसदीय सल्लागार समितीच्या बैठकीत अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. नवीन फौजदारी कायद्यांमुळे तपास वेगाने पुढे जात असून शिक्षा बजावण्याचा दरही वाढला आहे असं ते म्हणाले. 2021 मध्ये देशात कोणतीही मोबाइल फॉरेन्सिक प्रयोगशाळा नव्हती, मात्र आज ही संख्या आता एक हजारापर्यंत पोहोचली आहे. येत्या पाच वर्षांत देशभरात फॉरेन्सिक प्रयोगशाळांचं जाळं निर्माण करण्यासाठी 30 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार असून 2029 पर्यंत देशातल्या प्रत्येक राज्यामध्ये फॉरेन्सिक युनिव्हर्सिटी किंवा केंद्रीय फॉरेन्सिक प्रयोगशाळा असेल अशी माहिती अमित शहा यांनी यावेळी दिली.

**<u>निवडणूक-NOA</u>**

राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी, अंतिम उमेदवार यादी काल जाहीर झाली. त्यानुसार राज्यातल्या महानगरपालिकांच्या २ हजार ८६९ प्रभागांमधून १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत.
या निवडणुकीसाठी एकंदर ३३ हजार ४२७ अर्ज आले होते. त्यातले २४ हजार ७७१ अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ८ हजार ८४० उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे.
राज्यात सर्वाधिक १ हजार ७०० उमेदवार मुंबई महापालिका निवडणुकीत, तर १ हजार १६६ उमेदवार पुणे महापालिका निवडणुकीत आपलं नशीब आजमावत आहेत. नागपूरमध्ये ९९३ उमेदवार आहेत. सर्वात कमी २३० उमेदवार इचलकरंजी महापालिकेची निवडणूक लढवत आहेत.

**<u>साहित्य संमेलन</u>**

साताऱ्यात सुरू असलेल्या 99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात काल तिसऱ्या दिवशी भरगच्च कार्यक्रमांची रेलचेल होती. कार्यक्रमात नियोजित सावित्रीबाई फुले स्मारक संकल्प चित्रफीत दाखविण्यात आली. यावेळी मुख्यमंत्र्यांसह अन्य मान्यवरांनी महिला स्वयंसहाय्यता समुहांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या प्रदर्शन आणि  विक्री दालनांना भेट दिली.

दरम्यान , गेले तीन दिवस सुरू असलेल्या या साहित्य संमेलनाची आज सांगता रविवारी होणार आहे. ज्ञानपीठ पुरस्कारानं सन्मानित रघुवीर चौधरी यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले, सांगता समारंभाला उपस्थित राहणार आहेत.

**<u>संघ जाहीर</u>**

न्यूझीलंडविरुद्धच्या ३ एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघाची काल घोषणा झाली. संघाचं नेतृत्व शुभमन गिल याच्याकडे आहे, तर उपकर्णधारपदाची जबाबदारी श्रेयस अय्यरला देण्यात आली आहे. गोलंदाज मोहम्मद सिराज याचंही संघात पुनरागमन झालं आहे. ११ ते १८ जानेवारी दरम्यान भारतात ही मालिका होणार आहे. रोहित शर्मा, विराट कोहली यांच्यासह इतर खेळाडूंचाही संघात समावेश करण्यात आला आहे.

**<u>हवामान</u>**

दिल्ली, हरियाणा, चंदीगड, पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार आणि ओडिशासाठी उद्यापर्यंत दाट ते अति दाट धुक्याचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. येत्या तीन दिवसांत पंजाब, हरियाणा, चंदीगड आणि दिल्लीमध्ये थंडीच्या लाटेची शक्यताही वर्तवण्यात आली आहे.

दरम्यान, दिल्ली-एनसीआरमधील हवेची गुणवत्ता 'खराब' श्रेणीत कायम आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानुसार, आज सकाळी ७ वाजेपर्यंत राष्ट्रीय राजधानीचा सरासरी वायू गुणवत्ता निर्देशांक २९८ नोंदवला गेला.

# याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल ,नमस्कार